# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक

## घटक ३ : सामाजिक राजकीय सुधारक

## १) संत गाडगे महाराज

**प्रास्ताविक**

शेणगाव (जिल्हा अमरावती) येथे जानोरकर कुटुंबात गाडगे महाराज यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. त्यांचे नाव डेबूजी होते. वडिलांचे नाव झिंगराजी व आईचे नाव सखुबाई आहे. डेबुजी झिंगराजी जानोरकर यांना डेबूजी बुवा, वट्टीबुबा, चापरे बुवा, लोटके महाराज अशा विविध नावांनी सुरुवातीस लोक ओळखत पुढे संत गाडगे महाराज नावाने ते अवघ्या जगात प्रसिद्ध झाले. महाराज लहान असतानाचा १८८४ मध्ये त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. वडिलांच्या मृत्युनंतर त्यांचा सांभाळ दापूर येथील मामांनी केला. मामाची मोठी शेती होती. गाडगे महाराज यांना शेती व पशुपालनाची त्यातून आवड निर्माण झाली. महाराजांचे लग्न लहानपणी १८९२ मध्ये धनाजी खल्लारकर यांची मुलगी कुंताबाई यांच्याशी झाले. त्यांना आलोक (१८९९) व कलावती (१९००) या दोन मुली आणि मुद्गल (१९०२) व गोविंदा (१९०५) ही मुले अशी चार अपत्ये होती.

महाराजांनी त्यांच्या मुलीच्या बारशाला परंपरेप्रमाणे जेवण न देता गोड जेवण दिले. मामाच्या जमीन जप्त करणाऱ्या सावकारास त्यांनी विरोध केला. या गोष्टी प्रवाहाच्या उलट जाऊन केल्या. त्यातून त्यांचे धारिष्ट्य दिसून आले. गावातील लोकांना ते त्यांच्या गरजेच्यावेळी मदत करत असत. महाराज लोकांमध्ये काम करत घरात ते फार रमले नाहीत.

१९०४ मध्ये त्यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांना आपले गुरु मानले १९०५ मध्ये महाराजांनी जगाचा संसार सुखी करण्यासाठी गृहत्याग करत अत्यंत साधी राहणी स्वीकारली. समाज सुधारणेसाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले.त्यांनी सुरुवातीस श्रमंती केली. त्यातही त्यांची समाजसेवा सुरूच होती. महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशात त्यांचे कार्य सुरु होते. कुठलीही अपेक्षा न ठेवता ते समाज उपयोगी कामे करत असत. अंगावर फटके कपडे हातात झाडू व एक गाडगे असा त्याचा पेहराव असे. त्यामुळे त्याना लोक गाडगे बाबा म्हणू लागले. महाराज कीर्तन करत. कीर्तनातून सुधारणांचे विचार मांडत. अज्ञान अंधश्रद्धा विरोध, सामाजिक न्याय, , अहिंसा व स्वच्छता यावर त्यांचा अधिक भर असे.

महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक होऊन गेले. त्यात गाडगे महाराज यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाचे आहे. निरपेक्षपणे मानवजातीची सेवा करण्याचा संतांचा मार्ग गाडगे महाराज यांनी अनुसरला.

**महाराजांचे कीर्तनातून प्रबोधन**

गाडगे महाराज यांना लहानपणापासून भजन कीर्तन याची आवड होती. पुढे त्यांनी याच माध्यमातून समाज प्रबोधनास सुरुवात केली. गाडगे महाराज यांचे कीर्तन पद्धती वेगळी होती. साध्या सोप्या भाषेतील त्यांच्या संवादी कीर्तन पद्धतीचा जनमाणसावर सखोल परिणाम होत असे. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून ते प्रभावी संवाद साधत असत. आचार्य अत्रे गाडगे महाराज आणि त्यांच्या प्रभावी कीर्तन शैलीबद्दल म्हणत, ‘सिंहाला पाहावे वनात,हत्तीला पाहावे रानात,तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात’ महाराजांनी कीर्तनातून लोकजागृती प्रबोधन केले. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे महाराजांचे आवडते भजन होते. त्यानेच ते आपल्या कीर्तनाला सुरुवात करत. कीर्तनातून त्यांनी अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसन, जातीभेद याविरोधात संदेश दिला. महाराजांनी कीर्तनातून जे संदेश दिले त्यातील काही संदेश पुढीलप्रमाणे तहानलेल्या पाणी व भुकेलेल्यास जेवण, बेघरांना निवारा व गरिबांना वस्त्र द्या. गरिबांना शिक्षण व आजारी असलेल्यांना उपचार द्या. निराशांना हिम्मत व पशु पक्ष्यांना अभय द्या. असा संदेश ते लोकांना देत यातून त्यांची मानवतावादी दृष्टी दिसते.

**महाराजांचे शिक्षणविषयक विचार**

थोर समाजसुधारक गाडगे महाराज निरक्षर होते. लहानपणी वडिलांचे हरवलेले छत्र व मामाचा कर्जबाजरीपणा यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही पण त्यांनी अवघ्या महाराष्ट्रात शिक्षण प्रसारासाठी फार मोलाची भूमिका बजावली आहे.  गाडगे महाराजांनी समाज व समाजाच्या विविध समस्या अगदी जवळून पहिल्या व जाणून घेतल्या होत्या. या अनेक समस्यांवर शिक्षण मात करू शकते ही शिक्षणाची ताकद त्यांना ज्ञात होती. त्यामुळे समाजसुधारणेसाठी त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. केवळ पदवीसाठी शिक्षण नसते तर माणसाने माणूस म्हणून जगण्याचे ज्ञान त्यातून मिळते असा त्यांचा विश्वास होता. अज्ञान व अंधश्रद्धा निर्मुलन, स्वच्छता महत्त्व व सवय, उत्तम चारित्र्य, कष्टाची मानसिकता शिक्षणातून तयार होते. असा त्याचा विश्वास होता. शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे धोंडा असे ते म्हणत असत. शिक्षणाशिवाय आपला उद्धार

होणार नाही हे ते लोकांना पटवून देत.याबाबत ते नेहमी म्हणत हे लोक का गरिबीत ? ज्याले इद्या नसीन त्याले खटाऱ्याचा बैल म्हटले तरी चालेल ! आता तरी सुधरा. मुलाले शिक्षण द्या. इव्हायाले पाहुणचार करू नका. पण मुलाले शाळेत घातल्याशिवाय राहू नका '

**शिक्षणाचा प्रचार व प्रसार**

त्यांनी समाजाबद्दल असलेल्या आस्था तळमळ यातून सुधारणांसाठी शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षणालाच त्यांनी ईश्वरसेवा मानले. त्यांनी अनेक शाळा सुरु केल्या. विशेषत: त्यांनी ग्रामीण दुर्गम भागात गरीब आणि आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी अनेक आश्रमशाळा, वसतिगृहे आणि शाळा आणि बहुउद्देशीय संस्था स्थापन केल्या. १९२५ मध्ये मुर्तीजापूर येथे विद्यालय सुरु केले. पुढे ८ फेब्रुवारी १९५२ रोजी श्री गाडगेबाबा मिशन स्थापन करून महाराष्ट्रभर अनेक शिक्षणसंस्था व धर्मशाळा सुरु केल्या. त्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागात सुमारे ४२ शैक्षणिक संस्था उभ्या केल्या.

**शिक्षण कार्यासाठी मदत**

महाराजांनी स्वत: शिक्षण प्रसारासाठी काम करताना समकालीन अनेक सुधारक कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ पंजाबराव देशमुख यांना त्यांच्या शिक्षण कार्यासाठी पाठिंबा देत त्यांना अनुकूल समाजमन घडविण्यास प्रयत्न केले.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पीपल्स एजुकेशन सोसायटीला गौतम विद्यालयासाठी त्यांनी दोन एकर जागा दिली. पंढरपुरातील धर्मशाळा पीपल्स एज्युकेशन संस्थेस दिली. मुंबई सरकारने रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद केले तेव्हा गाडगे महाराज यांनी मुख्यमंत्री खेर यांना भेटून रयतच्या करयचे मोल पटवून दिले त्यामुळे बंद करण्यात आलेले रयतचे अनुदान पुन्हा सुरु झाले त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल पुढे शासनानेही घेत तत्कालीन नागपूर विद्यापीठाचे विभाजन करून तयार झालेल्या अमरावती विद्यापीठास संत गाडगेबाबा यांचे नाव देण्यात आले आहे.

**स्वच्छतेचा प्रसार व पुरस्कार**

अस्वच्छतेचा त्यांना तिटकारा होता. ते केवळ लोकांना उपदेश न करता ते कीर्तनासाठी जेथे जात त्या गावी आधी ते स्वत: झाडू घेऊन स्वच्छतेला सुरुवात करत. गावाची स्वच्छता झाल्यांनतरच ते कीर्तनाला सुरुवात करत. कीर्तनाच्या माध्यमातूनही त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व लोकांच्या

मनामध्ये रुजविण्याचे काम केले. अस्वच्छता अज्ञानाचे प्रतिक असून रोगराई टाळण्यासाठी वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेची आवश्यकता ते मांडत. अनेक आजार, व्याधी अस्वच्छ राहणी व कुपोषण यामुळे होतात हे महाराजांनी ओळखले होते. स्वच्छता सार्वजनिक आरोग्यासाठी आवश्यक आहे. सार्वजनिक स्वच्छता त्यांनी धर्म म्हणून स्वीकारला. त्यांनी स्वच्छतेचे उदात्तीकरण केले. त्यास महत्त्व व प्रतिष्ठा मिळवून देताना त्यांनी त्याची आवश्यकता व लाभ समजावून दिले. पुढे महाराष्ट्र शासनाने ग्राम स्वच्छता अभियानला त्यांचेच नाव देऊन त्यांचे या याक्षेत्रातील योगदानास गौरविले आहे. महात्मा गांधींनी 'चरख्यातून स्वराज्य' दिले तसे गाडगेबाबांनी 'खराट्यातून सुराज्य' सांगितले.

### हुंड्यास विरोध व स्त्री सुधारणा

गाडगे महाराज यांनी समाजातील अनेक अनिष्ट प्रथा परंपरा विरोध करताना स्त्रीविषयक प्रस्थापित अनिष्ट परंपरांनाही विरोध केला. समाजात प्रस्थापित हुंडा प्रथेस त्यांनी कडाडून विरोध केला. हुंडा देऊ नये व घेऊ नये असे ते कीर्तनातून लोकांच्या मनावर बिंबवत हुंडा देणे घेणे पाप आहे. जो हे पाप करील त्याच्या लग्नाला कोणी जाऊ नये असे अशा विवाहावर बहिष्कार टाकावा असे महाराजांचे मत होते. हुंड्यामुळे कुटुंबे कर्जबाजारी होत सावकाराचे दास होतात नवविवाहिताचा संसार कर्जाच्या उकीरड्यावर चालू करणे महापाप आहे, आत्मघात आहे असे ते म्हणत. हुंड्यासह इतर स्त्रीविषयक प्रश्नावर महाराजांची भूमिका कल्याणकारी होती. त्यांनी स्त्री सुधारणा व शिक्षणाला प्रोत्साहन दिले आहे.

### जातीभेद निर्मुलन

सामाजिक आणि आर्थिक विषमता जात व्यवस्थेतून निर्माण होते. त्यामुळे ही व्यवस्था व विषमता अमानवीय स्वरूपाची आहे. ही विषमता नष्ट करण्यासाठी समता प्रस्थापित होणे आवश्यक असल्याने गाडगे महाराज यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केला. सर्व माणसात देव असल्याचे सांगून ते जातीभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते सांगत. स्त्री व पुरुष अशा केवळ दोनच जाती जगात असून तीसरी जातच नसल्याचे ते सांगत. मानवतावादी समतावादी समाज निर्माण करण्यासाठी जातीव्यवस्था मोडून टाकण्याचा प्रयत्न गाडगेबाबांनी केला. जो जात विचारील तो महामूर्ख असणार त्यामुळे आपली जात एकच माणूस होय. अस्पृश्यता केवळ कायद्याने जाणार नाही तर त्यासाठी मतपरिवर्तन आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे

त्यांनी कीर्तनातून याबाबत जागृती घडविली व १९५२ मध्ये पंढरपूरला कीर्तन परिषद झाली त्यात कीर्तनकारांनी दलित सेवेसाठी पुढाकार घ्यावा व जातीभेद संपविण्यासाठी कीर्तनातून कार्य करावे अशी भूमिका महाराज यांनी मांडली होती.

**अंधश्रद्धा निर्मुलन व कर्मकांड व मूर्तीपुजेस विरोध**

गाडगे महाराज यांनी समाजातील अनिष्ट परंपरांना विरोध केला. समाजात डोळस श्रद्धेचा पुरस्कार केला. समाजातील अंधश्रद्धेवर ते आपल्या कीर्तनातून टीका करत. देवाच्या नावाने चालणाऱ्या प्राणीहत्येस त्यांनी विरोध केला. स्वत:च्या मुलीच्या बारशावेळी त्यांनी गावजेवण दिले पण परंपरेनुसार त्यांनी मटण न करता गोड पदार्थ केले. इतरांना उपदेश करताना त्यांनी स्वत: ही सुधारणावादी आचरण ठेवले. डोळस श्रद्धा दाखवून दिली. त्यांच्या कार्यामुळे अनेक गावातील प्राणीहत्या बंद झाली. वरवंडे गावातील पशुहत्या त्यांच्या प्रबोधनामुळेच १९३१ मध्ये बंद झाली.दगडपूजेत वेळ व पैसा खर्च करू नका. त्यसाठी हिंसा (पशूबळी) व तीर्थयात्रा करू नका. त्यांनी संत तुकाराम महाराज व संत कबीर यांना आदर्श मानत त्यांनी सांगितलेल्या डोळस व बुद्धीवादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करताना कर्मकांड व मुर्तीपुजेस विरोध केला

**व्यसनमुक्तीसाठी काम**

महाराज आपल्या कीर्तनातून व्यसन मुक्तीसाठी संदेश देत असत. वडिलांचा व्यसनामुळे अकाली मृत्यू होऊन कुटुंबाची दुरवस्था झाल्याचा अनुभव महाराजांनी स्वत: घेतला होता. ग्रामीण जीवन व व्यसनाधीनता व तिचे परिणाम त्यांनी जवळून पहिले होते. त्यामुळे समाज स्वास्थ्य टिकविण्यासाठी समाज दारूच्या व्यसनातून मुक्त झाला पाहिजे असे त्याचे आग्रही मत होते. ते कीर्तनातून दारुबाजांवर कठोर शाब्दिक हल्ला करत. भर कीर्तनात व्यसनाधीन व्यक्तीस उभे करून बोलत असत. कारण ही व्यसनाधीनता त्यांना रोखायची होती. त्यांनी दारू बरोबरच विडी, भांग, गांजा, तंबाखू अशा विविध प्रकारच्या व्यसनावरही टीका केली आहे.

**मानवतावादी कार्य**

गाडगेबाबांनी राज्यातील प्रमुख शहरांत व तीर्थक्षेत्री धर्मशाळा, आश्रमशाळा, नद्यांना घाट, पाणपोया, गोरक्षण, अंध-अपंगांसाठी सदावर्त, मुलांसाठी शाळा-कॉलेज व वसतिगृहे बांधून सर्वसामान्य जनतेची सोय केली. विविध तीर्थक्षेत्री व इतर लोकोपयोगी ठिकाणी ग्रामीण गरीब

लोकांची राहण्याची जेवणाची अडचण लक्षात घेऊन महाराजांनी अनेक निवासासाठी धर्मशाळा जेवणासाठी सोय उपलब्ध करून दिली. पंढरपूर मुर्तीजापूर मुंबई येथे त्यांनी बांधलेल्या धर्मशाळांनी भक्ताबरोबर रुग्णानाही सुविधा उपलब्ध करून दिल्या.

**समारोप**

संत गाडगे महाराजांनी सामाजिक सुधारणांचे मौलिक कार्य केले. आपल्या सुधारणावादी आचार व विचारांनी लोकांना प्रेरित व प्रोत्साहित केले. अनेक सदगुणांची शिकवण देताना अनिष्ट रूढी परंपरांवर कठोर टीका केली. त्यांच्या कार्यामुळे आचार्य अत्रे यांनी खराट्याचा बादशहा म्हणून तर डॉक्टर आंबेडकरांनी गरिबांचा कैवारी म्हणून गाडगे महाराजांचा गौरव केला आहे.

परिसर आणि मन दोन्ही स्वच्छ रहावे व ठेवावे यासाठी लोक जागृतीचे काम त्यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.